• वर्ष : ०३ • अंक : २६३ • पुणे • रविवार, दि. १४ जून २०२६ • मराठी दैनिक • पाने ४ • किंमत : २ रूपये • RNI No.-MAHMAR/2023/89313

दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

1,22,570
डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील लोकप्रिय दैनिक





# हवाई दलाचे विमान कोसळले

## पाच जणांचा मृत्यू; आसाममधील जोरहाट येथील दुर्घटना

**नवी दिल्ली (दै. आरंभ पर्व)**

आसाममधील जोरहाट येथील भारतीय हवाई दलाच्या तळावर उतरत असताना रशियन बनावटीच्या 'अँटोनोव्ह एएन-३२' या विमानाचा अपघात झाला. या दुर्घटनेत पाच जणांचा मृत्यू झाला असून त्यामध्ये दोन अधिकारी आणि दोन अग्निवीरांचा समावेश असल्याची माहिती हवाई दलाने दिली. या दुर्घटनेच्या कारणांचा शोध घेण्यासाठी चौकशी समिती नेमण्यात आली आहे.

हवाई दलाच्या माहितीनुसार सकाळी १० च्या सुमारास नियमित उड्डाणादरम्यान (सॉर्टि) या विमानाला अपघात झाला. धावपट्टीवर उतरताना विमानाचे नियंत्रण सुटले आणि ते कोसळले. त्यानंतर ते समांतर टॅक्सीवेवरून वेगाने पुढे गेले, त्याचे दोन तुकडे झाले आणि त्याला आग लागली. या घटनेनंतर जोरहाट हवाई तळाच्या अग्निशमन गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या आणि आगीवर नियंत्रण मिळवण्यात आले. एएन-३२ हे रशियन बनावटीचे, दोन इंजिन असलेले लष्करी वाहतूक करणारे विमान होते. या दुर्घटनेत स्क्वॉड्रन लीडर प्रशांत सिंग, फ्लाइट लेफ्टनंट शुभम कुमार, सार्जंट जितेंद्र शर्मा, अग्निवीरवायू खेमाराम कुमावत आणि अग्निवीरवायू दानिश आलम हे ठार झाले. या विमानात एकूण सहा जण होते. विमानाचा सह-वैमानिक जखमी झाला असून त्याला जोरहाट येथील लष्करी रुग्णालयात दाखल करण्यात आले.

### १० वर्षांत तीन अपघात

- गेल्या १० वर्षांत 'एन-३२' विमानांचा हा तिसरा मोठा अपघात आहे. २०१६ पासून यापैकी किमान दोन विमाने कोसळली असून, त्यात हवाई दलाचे ४२ जण दगावले.
- २२ जुलै २०१६ रोजी चेन्नईतील तांबरम हवाई तळावरून पोर्ट ब्लेअरकडे जाताना बंगालच्या उपसागरावरून उड्डाण करत असताना विमान बेपत्ता झाले. या दुर्घटनेत २९ जण ठार.
- ३ जून २०१९ रोजी अरुणाचल प्रदेशातील वेस्ट सियांग जिल्ह्यातील मेचुका येथे (चीनच्या सीमेजवळ) जात असताना 'एएन-३२' विमान डोंगराळ भागात कोसळले. या विमानात असलेले १३ जण मृत्यूमुखी.

## ठळक बातम्या

### महिलेवर हल्ला

पुणे (आरंभ पर्व) : भांडणातून दाखल केलेला गुन्हा मागे घेण्यासाठी महिलेला कारची धडक देऊन जिवे मारण्याचा प्रयत्न करण्यात आल्याची धक्कादायक घटना येरवडा भागात घडली. याप्रकरणी येरवडा पोलिसांकडून तिघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. धडकेत वसुधा धनंजय गरड (वय २९, रा. महाराष्ट्र हाऊसिंग बोर्ड, येरवडा) जखमी झाल्या आहेत. त्यांनी येरवडा पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दुचाकीस्वार वसुधा गरड गुरुवारी (दि. ११) दुपारी दीडच्या सुमारास येरवड्यातील शांतीरक्षक सोसायटी परिसरातून निघाल्या होत्या. त्या वेळी आरोपी त्यांच्या मागावर होते. शांतीरक्षक सोसायटीच्या प्रवेशद्वारासमोर कारने दुचाकीला धडक दिली. 'आमच्या विरोधात दाखल केलेला गुन्हा मागे घे. आता तू वाचली आहेस. पुढच्या वेळी काटा काढू', अशी धमकी देऊन आरोपी कारमधून पसार झाले, असे गरड यांनी फिर्यादीत म्हटले आहे. पुढील तपास पोलिस निरीक्षक खेडकर करत आहेत.

### पालकांची फसवणूक

पुणे (आरंभ पर्व) : एमबीबीएस अभ्यासक्रमास प्रवेश मिळवून देण्याचे आमिष दाखवत राज्यातील अनेक विद्यार्थी आणि पालकांची फसवणूक करणाऱ्या तेलंगणातील एकाला येरवडा पोलिसांनी अटक केली. आरोपीने आतापर्यंत ४० विद्यार्थ्यांची लाखो रुपयांची फसवणूक केल्याचे उघडकीस आले आहे. आरोपीविरोधात यापूर्वी हैदराबाद आणि मुंबईत फसवणुकीचे सहा गुन्हे दाखल आहेत. अरविंद प्रकाशकुमार आरोगोंडा (वय ४७, रा. सिकंदराबाद, तेलंगणा) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. वैद्यकीय अभ्यासक्रमास प्रवेश मिळवून देण्याचे आमिष दाखवून एका पालकाची आरोपी अरविंद आरोगोंडा याने आठ लाख १२ हजार रुपयांची फसवणूक केली होती.

## सरकारी कार्यालयांसाठी एअर इंडिया इमारतीला १८१ कोटींची झळाळी

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

सरकारच्या विविध विभागांच्या कार्यालयासाठी आता नरिमन पॉइंट येथील एअर इंडियाची २२ मजली इमारत उपलब्ध झाली आहे. इमारत ताब्यात घेतल्यानंतर या इमारतीची संरचनात्मक तपासणी करण्यात आली असून आता या इमारतीला नवी झळाळी दिली जाणार आहे. या नूतनीकरणासाठी १८१ कोटींचा निधी मंजूर करण्यात आला असून सहा महिन्यांत हे काम पूर्ण होणार आहे. एअर इंडिया इमारत राज्य सरकारने नुकतीच १ हजार ६०१ कोटी रुपये मोजून खरेदी केली. इमारतीची खरेदी प्रक्रिया पूर्ण होऊन इमारत ताब्यात आल्यानंतर सरकारने इमारतीची संरचनात्मक दुरुस्ती, नूतनीकरण आणि विद्युतीकरणाच्या कामाची जबाबदारी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे सोपवली आहे. त्यासाठी विभागाने तयार केलेल्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता मिळून वित्त विभागाने निधी मंजूर केल्याची माहिती सार्वजनिक बांधकाम विभागाचे सचिव आबासाहेब नागरगोजे यांनी दिली. एअर इंडिया इमारतीसाठी स्थापत्य आणि विद्युतीकरण अशा दोन स्वतंत्र निविदा काढण्यात येतील. निविदा काढण्याची प्रक्रिया सध्या सुरू असून इमारत नूतनीकरणाचे काम सहा महिन्यांत पूर्ण करण्यात येणार आहे. स्थापत्य कामात इमारतीची दुरुस्ती, सजावट, नवे फर्निचर आणि रंगरगोटीचा समावेश आहे. तर विद्युतीकरणात नव्या लिफ्ट, विद्युत उपकरणे बसवणे यांचा समावेश असल्याचे नागरगोजे यांनी सांगितले. एअर इंडिया इमारतीच्या नूतनीकरणासाठी राष्ट्रीय स्तरावरील वास्तुविशारदाची सल्लागार म्हणून नेमणूक केली जाणार आहे.



• सहा महिन्यात काम पूर्ण होणार

# विरोधकांना शत्रू मानून संपवण्याचे भाजपचे कारस्थान

## विकासदाराची आकडेवारी फसवी, यशवंत सिन्हा यांची टीका

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

देशात वाजपेयी सरकार असतानाही विरोधकांचा सन्मान केला जात होता, संसदेत कधीच विरोधकांना शत्रू मानले नाही पण सध्या विरोधकांना संपवण्याचे काम होत आहे. राजकीय प्रतिशोध सुरु आहे आणि यातून देशात भयानक संकट उभे ठाकले आहे. या संकटाचा सामना करण्यासाठी काँग्रेसने रस्त्यावर उतरण्याची घेतलेली भूमिका योग्यच आहे. कारण देशावर आलेल्या संकटातून मोदी सरकार बाहेर काढू शकत नाही, अशी टीका माजी केंद्रीय मंत्री यशवंत सिन्हा यांनी केली.

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचा अर्थशास्त्र विभाग व ऑल इंडिया प्रोफेशनल काँग्रेस यांच्या संयुक्त विद्यमाने 'भारतात येणारी आर्थिक त्सुनामी?' या विषयावरील चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. या चर्चासत्रात बोलताना यशवंत सिन्हा यांनी मोदी सरकारकडून सांगितल्या जाणाऱ्या विकासदाराचे आकडे चुकीचे असल्याचा दावा केला. भारताचा विकास दर ७.७ टक्के आहे हे ते सांगत आहेत पण सत्य वेगळे आहे. या आकड्यावर अनेक अर्थतज्ज्ञ शंका उपस्थित करतात. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीनेही भारताच्या आकड्यांवर शंका उपस्थित करून भारताला 'सी' ग्रेड मध्ये टाकले आहे आणि भारताचे आकडे विश्वास ठेवण्यासारखे नाहीत असे स्पष्ट सुनावले आहे. विशेष म्हणजे ब्राझील व दक्षिण आफ्रिका यांचाही नंबर 'ए' ग्रेड मध्ये आहे. गुंतवणूक वाढली तरच विकास दर वाढेल पण मागील १२ वर्षात गुंतवणूक ही जीडीपीच्या ३२ टक्क्यांच्या आसपास आहे, त्यात वाढ झालेली दिसत नाही, त्याच्या आधारे विकास दर ६ ते ६.५ टक्के होतो. सरकारने मांडलेले आकडे साफ चुकीचे आहेत. २०४७ मध्ये भारत विकसीत देश होईल असे मोदी सांगत आहेत पण त्यासाठी आपला विकासाचा दर हा ८ टक्क्यांच्या वर असला पाहिजे आणि सध्याचे आकडे पाहता ते उदिष्ट गाठता येणे फारच कठीण असल्याचे सिन्हा म्हणाले. भारताने याआधी अनेक मोठ्या संकटाचा सामना केला आहे आणि त्यातून देश पुन्हा ताकदीने उभा राहिला आहे. पंडित जवाहलाल नेहरु ते अटलबिहारी वाजपेयीपर्यंत सर्वच सरकारांनी संकटाचा मुकाबला केला पण सध्याच्या मोदी सरकारमध्ये संकटाचा मुकाबला करण्याची इच्छाशक्तीच नसल्याची टीका त्यांनी केली. या चर्चासत्रात ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ प्रा. अरुणकुमार, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, माजी खासदार व नियोजन आयोगाचे माजी सदस्य डॉ. भालचंद्र मुणगेकर, माजी खा. कुमार केतकर आदी उपस्थित होते, कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ होते.



# जाचक अटी रद्द करण्याचे जाहीर करा

## रोहितला शेतकऱ्यांच्या ओटीत टाकलं : राजेंद्र पवार

**पंढरपूर (दै. आरंभ पर्व)**

शेतकरी कर्जमाफीतील २०१९ ची अट रद्द करण्याचा निर्णय घ्या, तत्काळ आंदोलन मागे घेतो. कृषिमंत्री व जबाबदार मंत्र्यांनी या बाबत माध्यमांसमोर रविवार संध्याकाळपर्यंत घोषणा करा. अन्यथा सोमवारपासून संत नामदेव पायरीजवळ बसून 'अन्नत्याग आंदोलन' सुरू करू, असा इशारा आमदार रोहित पवार यांनी दिला आहे. शेतकऱ्यांचे कर्ज माफी व अन्य मागणीसाठी पंढरपूर येथे अन्नत्याग आंदोलन सुरू आहे. आंदोलनाचा शनिवारी दुसरा दिवस होता. या आंदोलनाला दुसऱ्या दिवशी शेतकऱ्यांकडून चांगला प्रतिसाद मिळाला. शेतकऱ्यांची कर्ज माफी व जाचक अटींसह विविध मागण्यांसाठी आमदार रोहित पवार यांनी पंढरपूर येथे 'अन्नदात्यासाठी अन्नत्याग' आंदोलन सुरू केले आहे. शनिवारी सकाळी उपजिल्हा रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी यांनी आमदार पवार यांची वैद्यकीय तपासणी केली. यात त्यांचा रक्तदाब व साखर पूर्ण नियंत्रणात असल्याचे जाहीर केले. आंदोलनाच्या दुसऱ्या दिवशी विविध संघटनेचे पदाधिकारी, शेतकऱ्यांचा पाठिंबा वाढला आहे. शेतकरी नेते अजित नवले यांनी आंदोलनस्थळी भेट देवून पाठिंबा दिला. देवेंद्र फडणीस यांनी अटी शर्थींचा त्रास होणार नाही, हे सिद्ध करून दाखवावे, असे आव्हान नवले यांनी दिले.

या आंदोलनाबाबत कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी सलग दोन दिवस पवार यांच्याशी दूरध्वनीद्वारे चर्चा केली. यानंतर आमदार रोहित पवार यांनी आपली भूमिका मांडली. २०१९ च्या कर्जमाफीची अट रद्द झाली असे मुख्यमंत्री, भरणे, सत्ताधारी भाजपच्या पक्षातील बावनकुळे अथवा जबाबदार मंत्र्यांनी जाहीर करावे. माध्यमांना सांगा, तत्काळ आंदोलन मागे घेऊन आपण सरकार सोबतच्या बैठकीला येऊ. अन्यथा सोमवारी पंढरपुरातील विठ्ठल मंदिराच्या संत नामदेव पायरी येथे आंदोलन करू, असा इशारा पवारांनी दिला. या आंदोलनात अनेक सहकारी यांची तब्येत खराब होत असल्याचे सांगत असतानाच लोकांनी कुणाचीही गाडी अडवून आंदोलन करू नये. गाड्यांची तोडफोड करू नये, असेही यावेळी पवार म्हणाले.



## महिलांचा देशात डंका; सुक्ष्म अन्न प्रकिया योजनेत निर्माण केले वर्चस्व

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

पंतप्रधान सुक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजनेत महाराष्ट्र देशात आघाडीवर आहे. या योजनेच्या अंतर्गत राज्यात एकूण ३०,९७७ प्रकल्प सुरू झाले आहेत. त्यापैकी महिला लाभार्थ्यांची संख्या १७,३४८ आहे. राज्यातील एकूण लाभार्थ्यांमध्ये महिलाचा वाटा ५६ टक्के आहे. छत्रपती संभाजीनगर ९४ टक्के, तर जालना जिल्ह्यात ८१ टक्के लाभार्थी महिला आहेत. त्यामुळे अन्न प्रक्रिया योजनेत राज्यातील महिलांनी आपले वर्चस्व निर्माण केल्याचे सिद्ध झाले आहे. आत्मनिर्भर भारत अभियानाचा एक भाग म्हणून पंतप्रधान सुक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजनेची (पीएमएफएमई) २९ जून २०२० रोजी देशभरात सुरूवात करण्यात आली. केंद्र सरकारच्या अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालयाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या या योजनेची राज्यात कृषी विभागाच्या वतीने अंमलबजावणी केली जाते. योजना सुरू झाल्यापासून देशात महाराष्ट्र, बिहार ही राज्ये आघाडीवर राहिली आहेत. राज्याचा विचार करता, १२ जून २०२६ पर्यंत ३६ जिल्ह्यांत एकूण ३०,९७७ उद्योग सुरू झाले आहेत. त्यापैकी १७,३४८ उद्योग महिलांनी सुरू केले आहेत. एकूण लाभार्थ्यांपैकी महिलांची संख्या ५६ टक्के आहे. छत्रपती संभाजीनगरमध्ये महिला लाभार्थ्यांची संख्या ९४ टक्के, तर जालन्यात ८१ टक्के आहे. या दोन जिल्ह्यांसह वर्धा, धुळे, लातूर, वाशिम, मुंबई उपनगर, सिंधूदुर्ग, परभणी आणि हिंगोली जिल्ह्यांत महिला लाभार्थींची संख्या ६० टक्क्यांपेक्षा जास्त आहे.



## थोडक्यात पण महत्वाचे



### जुन्नर तालुक्याच्या विविध गावांत "खेत बचाओ अभियान"

जुन्नर (आरंभ पर्व) : भारतीय कृषी अनुसंधान परिषद, नवी दिल्ली यांच्या वतीने राबविण्यात येणारे "खेत बचाओ अभियान" जुन्नर तालुक्यातील विविध गावांमध्ये उत्साहात संपन्न झाले. या अभियानांतर्गत गोळेगाव,अलदरे,आगर, पिंपळगाव सिद्धनाथ, कुसूर, वडज, चिंचोली, पारुंडे आणि वैष्णवधाम या गावांमध्ये शेतकरी मार्गदर्शन कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमासाठी फोरकास्ट ॲग्रोटेक इनोव्हेशन्स प्रा. लि. आणि डिसेंट फाउंडेशन, पुणे यांचे सहकार्य लाभले. देशभरात १ ते ३० जून या कालावधीत सुरू असलेल्या या अभियानांतर्गत केंद्रीय कृषी मंत्रालयाच्या अधिपत्याखालील भारतीय कृषी अनुसंधान परिषद – केंद्रीय कापूस तंत्रज्ञान संशोधन संस्था, माटुंगा (मुंबई) येथे कार्यरत असलेले प्रमुख शास्त्रज्ञ डॉ.अशोककुमार भारीमल, प्रधान शास्त्रज्ञ डॉ. कनिका शर्मा, तांत्रिक अधिकारी शरद कोकणे, मुख्य तांत्रिक अधिकारी प्राची म्हात्रे, फोरकास्ट ॲग्रोटेक चे संचालक डॉ. संतोष सहाणे,कृषी विज्ञान केंद्र नारायणगाव चे मृदा शास्त्रज्ञ योगेश यादव ,कृषिभूषण श्रीराम गाढवे व जितेंद्र बिडवई, कृषी सहायक अमोल मोरे व बापूसाहेब रोकडे यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले.

### शेअर बाजारातील कोट्यवधींच्या नुकसानीने उद्ध्वस्त झाले कुटुंब



• पत्नी व दोन चिमुकल्यांना विष देऊन पित्याची आत्महत्या

वैराग (आरंभ पर्व) : सोलापूर जिल्ह्यातील हात्तीज येथे घडलेल्या एका हृदयद्रावक घटनेने संपूर्ण परिसर सुन्न झाला आहे. शेअर बाजारातील मोठ्या आर्थिक नुकसानीच्या नैराश्यातून एका पित्याने पत्नी आणि दोन निरागस मुलांचे आयुष्य संपवून स्वतःही मृत्यूला कवटाळल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, योगेश बाळासाहेब पाटील (वय ४१) यांनी पत्नी माधुरी (वय ३७) तसेच मुलगे अर्थव (वय ११) आणि शिवांश (वय ९) यांना आईस्क्रीममधून विषारी आळीनाशक औषध दिल्याचा संशय आहे. त्यानंतर त्यांनी राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना सकाळी उघडकीस आली. नेहमीप्रमाणे दूध देण्यासाठी आलेल्या व्यक्तीने दरवाजा ठोठावला, आवाज दिला; मात्र घरातून कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. संशय आल्याने स्थानिकांच्या मदतीने दरवाजा तोडण्यात आला. आत दिसलेले दृश्य अंगावर शहारे आणणारे होते. घरात योगेश पाटील यांचा मृतदेह गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला, तर पत्नी आणि दोन्ही चिमुकले मृतावस्थेत पडलेले होते. काही क्षणांतच संपूर्ण गावात ही बातमी वाऱ्यासारखी पसरली आणि परिसरात शोककळा पसरली. प्राथमिक माहितीनुसार, योगेश पाटील यांना शेअर बाजारातील व्यवहारांत तब्बल १ कोटी ८० लाख रुपयांचे नुकसान झाले होते. या आर्थिक विवंचनेतून आणि नैराश्यातून त्यांनी हे टोकाचे पाऊल उचलल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे. मात्र, घटनेमागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नसून पोलीस सर्व बाजूंनी तपास करत आहेत. दरम्यान, एकाच घरातील चार जणांच्या अकाली मृत्यूमुळे हात्तीज गावासह संपूर्ण परिसर हळहळ व्यक्त करत आहे. अर्थव आणि शिवांश या दोन निरागस मुलांचे निष्पाप चेहरे पाहून गावकऱ्यांचे डोळे पाणावले आहेत. आर्थिक संकट किती भयंकर रूप धारण करू शकते, याची ही घटना अस्वस्थ करणारी जाणीव करून देणारी ठरली आहे.

### जिद्द, चिकाटी आणि आत्मविश्वासाचा चिमुकल्या रोनकचा प्रेरणादायी प्रवास



जुन्नर (आरंभ पर्व) : पुणे वनविभाग व पुणे पोलीस यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या "वृक्षाथॉन" या पर्यावरणपूरक आणि आरोग्यदायी उपक्रमात अवघ्या साडेपाच वर्षांच्या रोनक मडके या चिमुकल्याने उत्साहाने सहभाग घेत एक उल्लेखनीय कामगिरी केली आहे. त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे. वयाच्या केवळ साडेपाचव्या वर्षी त्याने तब्बल दहा किलोमीटरचे अंतर एक तास ४१ मिनिटांत पूर्ण करून सर्वांना आश्चर्याचा सुखद धक्का दिला. एवढ्या लहान वयात इतके मोठे अंतर धावणे ही केवळ शारीरिक क्षमता व त्याच्या दिशांत मेहेर सरांची THE LEGEND अकॅडमी व त्याची त्यामागे असलेली जिद्द, चिकाटी, आत्मविश्वास आणि नियमित सराव यांचे हे जिवंत उदाहरण आहे. वृक्षाथॉन हा केवळ धावण्याचा कार्यक्रम नसून पर्यावरण संवर्धन, वृक्षसंवर्धन आणि निरोगी जीवनशैलीचा संदेश समाजापर्यंत पोहोचवणारा एक महत्त्वपूर्ण उपक्रम आहे. अशा उपक्रमात आपल्या चिमुकल्याने सहभाग घेऊन पर्यावरणाबद्दलची जागरूकता आणि खेळाप्रती असलेले प्रेम दोन्ही जपले आहे.

### जुन्नरमधील नियमबाह्य गतिरोधक हटविण्याची मागणी



जुन्नर (आरंभ पर्व) : जुन्नर नगर परिषदेच्या मार्फत शहरात नव्याने काही ठिकाणी केलेले गतिरोधक (स्पीड ब्रेकर) वाहतूक नियम व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार नसल्याची तक्रार नागरिकांनी नगर परिषद प्रशासनाकडे केली आहे. याबाबत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे शहरप्रमुख शैलेश बनकर यांनी मुख्याधिकाऱ्याना निवेदन दिले आहे. या निवेदनात चुकीच्या पद्धतीने केलेल्या गतिरोधकांमुळे दुचाकीस्वार व चारचाकी वाहनचालकांना त्रास सहन करावा लागत असून अपघाताचा धोका वाढला आहे. याचबरोबर पावसाळ्यात रस्त्यावर पाणी साचणे, रुग्णवाहिकांसाठी अडथळा निर्माण होणे, नागरिकांच्या दैनंदिन प्रवासात अडचणी निर्माण होत असल्याचे नमूद केले आहे. नगर परिषद प्रशासनाने शहरातील सर्व गतिरोधकांची पाहणी करून नियमबाह्य व चुकीच्या ठिकाणी उभारलेले गतिरोधक तात्काळ हटवावेत तसेच आवश्यक ठिकाणीच नियमानुसार गतिरोधक बसवावेत अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

# वाढदिवसानिमित्त गोशाळेस केली मदत

## कौशल्याबाई वसंतराव मते यांचा ७५वा अमृत महोत्सव उत्साहात साजरा





**पुणे (दै. आरंभ पर्व)**

खडकवासला शिवसेना विधानसभा अध्यक्ष शिवाजीराव मते यांच्या मातोश्री कौशल्याबाई वसंत मते यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त अमृत महोत्सव सोहळा सावित्री गार्डन लॉन्स धायरी येथे मोठ्या उत्साहात आणि आनंदमय वातावरणात साजरा करण्यात आला. या सोहळ्यास विविध क्षेत्रातील मान्यवर, नातेवाईक आणि मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होता.

कार्यक्रमास आमदार भीमराव तापकीर, शिवसेना पुणे शहर प्रमुख वसंत मोरे, पुणे जिल्हा परिषद उपाधक्ष शुक्राचार्य वांजळे, कात्रज दुध उत्पादक संघाचे अध्यक्ष भगवान बापू पासलकर पुणे जिल्हा बँकेचे संचालक विकास नाना दांगट पाटील नगरसेवक सचिन मोरे, नगरसेवक हरिदास चरवड, नगरसेवक सायली ताई वांजळे नगरसेविका सीमाताई बेलदरे,कोमल नवले ,पंचायत समिती सदस्य युवराज वांजळे सुभाषभाऊ पोकळे मा .सरपंच सुरेश भाऊ पोकळे ऐड.राजेश मिंडे शंकर धोणे महाराज युवा नेते राहुल घुले जिल्हा संघटक सचिन पासलकर, नितीन वाघ संदीप मते पाटील यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभली.

यावेळी बोलताना आमदार भीमराव तापकीर यांनी कौशल्याबाई मते यांना दीर्घायुष्य लाभावे व त्यांचा आशीर्वाद सर्वांना मिळत राहावा, अशा शुभेच्छा दिल्या. "पुत्र शिवाजी मते यांना आईने दिलेल्या संस्कारांमुळेच ते आज समाजात चांगले कार्य करत आहेत," असे गौरवोद्गार त्यांनी काढले. वसंत मोरे यांनी आपल्या मनोगतात, "आईचा आशीर्वाद पाठीशी असल्यास आयुष्यात कोणतेही ध्येय गाठणे शक्य होते," असे सांगत कौशल्याबाई मते यांच्या मातृत्वाचा गौरव केला. याप्रसंगी ह.भ.प. चंद्रकांत गोगावले, मिलिंद पोकळे, विलास मते, विजय मते यांच्यासह विविध मान्यवरांनी मनोगत व्यक्त करून कौशल्याबाई मते यांना शुभेच्छा दिल्या. अमृत महोत्सवानिमित्त कुटुंबीयांच्या वतीने सामाजिक बांधिलकी जपत माऊली ज्ञानसंस्कार गुरुकुल गोशाळेस देणगी प्रदान करण्यात आली. तसेच वाचन संस्कृतीला प्रोत्साहन देण्यासाठी वाचनालयास उपयुक्त पुस्तकांचे वाटप करण्यात आले. या उपक्रमांचे उपस्थितांनी विशेष कौतुक केले. कार्यक्रमाच्या शेवटी शिवाजीराव मते यांनी उपस्थित सर्व मान्यवर, नातेवाईक आणि मित्रपरिवाराचे आभार मानले. "आईने दिलेल्या संस्कारांच्या बळावर यापुढेही जनसेवा करण्याचा संकल्प कायम ठेवणार आहे," अशी भावना त्यांनी व्यक्त केली. रुचकर भोजनाच्या आयोजनासह प्रेम, आपुलकी, कृतज्ञता आणि सामाजिक बांधिलकीचा संदेश देणारा कौशल्याबाई मते यांचा अमृत महोत्सव सोहळा उत्साहात संपन्न झाला.

## 'स्टेट ऑफ जॉय'ची भारतात दमदार एंट्री

• आरामदायी आणि स्टायलिश स्नीकर्सची नवी ओळख

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

देशातील पादत्राणांच्या बाजारपेठेत नवीन पर्वाची सुरुवात करत 'स्टेट ऑफ जॉय' या प्रीमियम स्नीकर ब्रँडने भारतात आपल्या उत्पादनांचे अधिकृत लाँच केले आहे. आराम, शैली आणि वैयक्तिक अभिव्यक्ती यांचा संगम घडवून आणणाऱ्या या ब्रँडकडून भारतीय ग्राहकांना नव्या प्रकारचा अनुभव देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. पादत्राणे क्षेत्रातील अनुभवी उद्योजक पुल्लेला गोपालकृष्ण बाची आणि दासरी राजू रमेश यांनी 'स्टेट ऑफ जॉय'ची स्थापना केली आहे. दैनंदिन वापरातील पादत्राणांची व्याख्या बदलण्याच्या उद्देशाने हा ब्रँड बाजारात उतरला असून, आधुनिक जीवनशैलीला साजेशी रचनात्मक आणि आरामदायी स्नीकर्स ग्राहकांसमोर आणण्यात आली आहेत. ब्रँडच्या उत्पादनांची निर्मिती 'ॲनाटॉमी-फर्स्ट' अर्थात पायांच्या नैसर्गिक रचनेला प्राधान्य देणाऱ्या संकल्पनेवर आधारित आहे. त्यामुळे दिवसभर वापर करताना आराम, आधार आणि सहज हालचालींचा अनुभव मिळावा यावर विशेष भर देण्यात आला आहे. आधुनिक फॅशन आणि कार्यक्षमतेचा समतोल साधत तयार करण्यात आलेल्या या स्नीकर्समुळे ग्राहकांच्या बदलत्या अपेक्षा पूर्ण होती.

## मतदार यादी पुनरीक्षण मोहिमेची प्रभावी अंमलबजावणी करा

*ॲड. प्रसन्नदादा जगताप : हिंगणेत अधिकारी व लोकप्रतिनिधी यांची समन्वय बैठक संपन्न*




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

भारत निवडणूक आयोगाच्या मतदार यादी पुनरीक्षण (एसआरए) अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी हिंगणे खुर्द येथे लोकप्रतिनिधी, केंद्रस्तरीय अधिकारी आणि कार्यकर्त्यांची समन्वय बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीत अभियानाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी आवश्यक उपाययोजनांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

नगरसेवक ॲड. प्रसन्नदादा जगताप यांच्या जनसंपर्क कार्यालयात झालेल्या या बैठकीत प्रभागातील प्रत्येक मतदारापर्यंत अचूक माहिती पोहोचविणे, प्रत्येक कुटुंबाशी संपर्क साधणे, नवमतदारांची नोंदणी करणे, मतदार यादीतील त्रुटी दूर करणे तसेच एसआरएअंतर्गत सुरू असलेली कामे वेळेत पूर्ण करण्यावर भर देण्यात आला.

यावेळी बोलताना ॲड. प्रसन्न जगताप यांनी सांगितले की, "मतदार यादीतील प्रत्येक नाव हे लोकशाहीचा पाया मजबूत करणारे आहे. कोणताही पात्र मतदार मतदानाच्या हक्कापासून वंचित राहू नये, यासाठी सर्वांनी जबाबदारीने काम करणे गरजेचे आहे." लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी अचूक व अद्ययावत मतदार यादी अत्यंत आवश्यक असून, या अभियानात बीएलओ, कार्यकर्ते आणि लोकप्रतिनिधी यांची भूमिका महत्त्वाची असल्याचेही यावेळी अधोरेखित करण्यात आले.

बैठकीस भाजपचे एसआरए प्रमुख प्रदीप मांगलेकर, विविध बीएलओ, पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच संबंधित अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उपस्थितांनी मतदार नोंदणी व पुनरीक्षण मोहिमेला अधिक गती देण्याचा निर्धार व्यक्त केला.

## मतदारसंघातील भाजपची महत्त्वपूर्ण बैठक संपन्न



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

खडकवासला विधानसभा मतदारसंघातील भारतीय जनता पक्षाची महत्त्वपूर्ण संघटनात्मक बैठक अनुश्री हॉल, माणिकबाग, सिंहगड रोड येथे आमदार भिमराव आण्णा तापकीर यांच्या प्रमुख उपस्थितीत उत्साहात पार पडली.

बैठकीत संघटनात्मक विषय, आगामी कार्यक्रमांचे नियोजन तसेच मतदारसंघातील विविध विकासकामांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. पक्ष संघटना अधिक सक्षम आणि प्रभावी करण्यासाठी कार्यकर्त्यांशी संवाद साधत आमदार तापकीर यांनी मार्गदर्शन केले. आगामी काळात पक्षाची ताकद तळागाळापर्यंत पोहोचविण्यासाठी सर्वांनी एकजुटीने काम करण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.

यावेळी एसआरए निवडणूक प्रणालीबाबत सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी सतर्क राहून नियोजनबद्ध पद्धतीने काम करण्याची आवश्यकता असल्याचे मत व्यक्त करण्यात आले. तसेच लवकरच होणाऱ्या पदवीधर मतदारसंघ निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जास्तीत जास्त पात्र मतदारांची नोंदणी करण्यासाठी प्रत्येकाने पुढाकार घ्यावा, असे आवाहन करण्यात आले. पदवीधर मतदार नोंदणी अभियान प्रभावीपणे राबवून पक्ष संघटना अधिक मजबूत करण्यावर यावेळी विशेष भर देण्यात आला. या प्रसंगी पुणे महानगरपालिकेचे नगरसेवक तथा सिंहगड रोड क्षेत्रीय कार्यालय प्रभाग समिती अध्यक्ष सचिनभाऊ मोरे, खडकवासला विधानसभा प्रभारी मनिषाताई लडकत, शिवणे-धायरी मंडल प्रभारी गणेश कळमकर, मंडल अध्यक्ष यशवंत लायगुडे, विजय मते, नगरसेवक हरिदास चरवड, सुभाषभाऊ नाणेकर, धनश्री कोल्हे, जयश्री भूमकर, कोमल नवले, प्रदेश ओबीसी मोर्चा सचिव दत्तात्रय कोल्हे, शहर ओबीसी मोर्चा सरचिटणीस रमेशबापू गायकवाड, राजू कुटे, तुषार पोकळे, ऋषिकेश गुट्टे यांच्यासह पक्षाचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. बैठकीत संघटनात्मक बळकटी, कार्यकर्त्यांचे सक्षमीकरण आणि विकासकामांना अधिक गती देण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.




## ICSI कडून ई-व्होटिंगसह अनेक महत्त्वपूर्ण उपक्रमांची घोषणा

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

द इन्स्टिट्यूट ऑफ कंपनी सेक्रेटरीज ऑफ इंडिया (ICSI) यांच्या 27व्या नॅशनल कॉन्फरन्स ऑफ प्रॅक्टिसिंग कंपनी सेक्रेटरीजचे उद्घाटन आज पुण्यात झाले. "Company Secretaries as Leaders: AI, ESG & Stewardship" या संकल्पनेवर आधारित दोन दिवसीय परिषदेत उद्योग क्षेत्रातील मान्यवर, वरिष्ठ कॉर्पोरेट व्यावसायिक आणि नियामक संस्थांचे अधिकारी सहभागी झाले आहेत. या प्रसंगी ICSI ने एक ऐतिहासिक घोषणा करत 2026 च्या निवडणुका पूर्णपणे ऑनलाइन पद्धतीने घेण्यात येणार असल्याचे जाहीर केले.

विशेष म्हणजे, कोणत्याही व्यावसायिक संस्थेकडून प्राधान्यक्रम मतदान ऑनलाइन पद्धतीने घेण्याची ही जगातील पहिलीच वेळ असल्याचा दावा संस्थेने केला आहे.

# जमिनींचे संरक्षण व कथित गैरप्रकारांची चौकशी करण्याची मागणी



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

श्री नागरमल खंडोबा देवस्थान न्यासाने देवस्थानच्या मालकीच्या जमिनींचे संरक्षण, प्रलंबित प्रकरणांचा तातडीने निकाल आणि विविध कथित गैरव्यवहारांची सखोल चौकशी करण्याच्या मागण्यांसह प्रशासनाकडे पाठपुरावा सुरू ठेवला आहे. देवस्थानच्या वतीने प्रसिद्ध करण्यात आलेल्या निवेदनात अनेक गंभीर मुद्दे उपस्थित करण्यात आले आहेत. न्यासाच्या म्हणण्यानुसार, हवेली तहसील कार्यालयात देवस्थानच्या शेतजमिनीच्या ताब्यासंदर्भातील प्रकरणाचा निकाल अद्याप प्रलंबित आहे. या प्रकरणाचा फायदा घेत काही पुजारी, जमीनदार व भूमाफिया संबंधित जमीन बळकावण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे तहसीलदार हवेली यांनी ताब्याच्या प्रकरणाचा निकाल लवकरात लवकर द्यावा, अशी प्रमुख मागणी करण्यात आली आहे. न्यासाने आणखी एक गंभीर आरोप करताना सांगितले की, ३२-ग अंतर्गत दावा फेटाळण्यात आल्यानंतरही मांजरी बुद्रुक येथील तलाठी कार्यालयामार्फत इतर हक्कांच्या सदरी काही व्यक्तींची वंशावळ लावण्यात आली आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधित नोंदी रद्द करण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच, कधीही रद्द न होणारी कथित कुलमुखत्यारपत्रे बेकायदेशीररीत्या लिहून देणे व त्याद्वारे देवस्थानच्या मालमत्तेवर हक्क निर्माण करण्याचा प्रयत्न झाल्याचा आरोपही न्यासाने केला आहे. या प्रकरणात संबंधित व्यक्तींची चौकशी करून कायदेशीर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

न्यासाच्या माहितीनुसार, काही पुजाऱ्यांच्या तीन कुटुंबांतील १२ जणांसह दीपक सोपान कुचेकर, अरविंद धोंडीबा भुजबळ आणि विवेक रमेश मतकर या तिघांचा मिळून एकूण १५ जणांचा बदल अर्ज देवस्थान ट्रस्ट स्थापन करण्यासाठी सहायक धर्मादाय आयुक्त कार्यालयात दाखल करण्यात आला आहे. या तिघांचा देवस्थानशी कुलदैवत म्हणून कोणताही संबंध नसल्याचा दावा न्यासाने केला आहे.

न्यासाने असा आरोप केला आहे की, जुन्या ७/१२ उताऱ्यावरील "व्यवस्थापक" या नोंदीचा गैरवापर करून, ज्यांची नावे सध्याच्या सातबारावर व्यवस्थापक किंवा व्यवस्थापन म्हणून नोंदलेली नाहीत अशा व्यक्तींनी श्री दीपक सोपान कुचेकर यांच्या नावाने कथितरीत्या "कधीही न रद्द होणारे कुलमुखत्यारपत्र" लिहून दिले आहे. विशेष म्हणजे या कुलमुखत्यारपत्रामध्ये देवस्थानचे नाव ७/१२ उताऱ्यावरून कमी करून त्याठिकाणी दीपक कुचेकर यांचे नाव नोंदविण्याचा उल्लेख करण्यात आल्याचा आरोप न्यासाने केला आहे. सध्या चालू सातबारावर संबंधित पुजाऱ्यांची अथवा त्या व्यक्तींची नावे अस्तित्वात नसताना अशा प्रकारचे दस्तऐवज नोंदणी कार्यालयामार्फत कसे तयार झाले, याचीही चौकशी करण्यात यावी, अशी मागणी न्यासाने केली आहे. न्यासाने दिलेल्या माहितीनुसार, १ मे १९९४ रोजी श्री नागरमल खंडोबा देवस्थान ट्रस्टची सर्व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून धर्मादाय विभागाकडे नोंदणी क्रमांक ए-२११० अंतर्गत नोंदणी करण्यात आली आहे. देवस्थानच्या मालकीची मांजरी बुद्रुक येथे २४ एकर आणि तुळापूर येथे २४ एकर अशी एकूण ४८ एकर जमीन आहे. यापैकी मांजरी येथील जमीन कुळांकडे तर तुळापूर येथील जमीन पुजाऱ्यांच्या ताब्यात असल्याचे सांगण्यात आले.

### जमीन व्यवहारांबाबत आरोप

न्यासाने केलेल्या आरोपांनुसार, काही पुजाऱ्यांनी ७/१२ उताऱ्यावरील "व्यवस्थापक" या नोंदीचा गैरवापर करून १९३४ पासून कुळांना खंडचिठ्ठी करार करून दिले. तसेच २००४, २००५ आणि २००७ या कालावधीत खरेदीखत, साठेखत, विसारपावती आणि करारनाम्यांद्वारे व्यवहार करून धनादेशाद्वारे रक्कम स्वीकारल्याचा आरोप करण्यात आला आहे.

### देवस्थान विकासासाठी कार्यरत

न्यासाने स्पष्ट केले की, भाविकांकडून मिळणाऱ्या देणगीतून देवस्थान परिसराचे सुशोभीकरण, विविध धार्मिक उत्सवांचे आयोजन आणि भाविकांना आवश्यक सुविधा पुरविण्याचे काम सातत्याने केले जात आहे. तसेच सहायक धर्मादाय आयुक्त कार्यालय, तहसीलदार हवेली आणि प्रांत कार्यालयात सुरू असलेल्या विविध दाव्यांमध्ये वकिलांमार्फत भक्कम पुरावे सादर करून कायदेशीर लढाई लढली जात आहे. दरम्यान, प्रलंबित ताबा प्रकरणाचा तातडीने निकाल देणे, संशयास्पद नोंदी रद्द करणे, कथित बेकायदेशीर व्यवहारांची चौकशी करणे, संबंधित नोंदणी प्रक्रियेची तपासणी करणे आणि दोषींवर कारवाई करणे, या प्रमुख मागण्यांकडे प्रशासनाने गांभीर्याने लक्ष द्यावे, अशी मागणी श्री नागरमल खंडोबा देवस्थान न्यासाने केली आहे.



## बिशप स्कूलचा विद्यार्थी असल्याचा अभिमान : डॉ. सायरस पूनावाला

पुणे (आरंभ पर्व) : "बिशप स्कूलने मला केवळ शिक्षण दिले नाही, तर माझ्या संपूर्ण आयुष्याचा भक्कम पाया घातला. आज मी जे काही आहे, त्यामागे या शाळेचे मोठे योगदान आहे. त्यामुळे बिशप स्कूलचा माजी विद्यार्थी असल्याचा मला सार्थ अभिमान आहे. शाळेच्या विकासासाठी कोणत्याही प्रकारची मदत करण्यास मी कायम तयार आहे," असे प्रतिपादन सिरम इन्स्टिट्यूट ऑफ इंडियाचे संस्थापक व पद्मभूषण डॉ. सायरस पूनावाला यांनी केले. कॅम्प परिसरातील द बिशप स्कूलच्या नव्या शैक्षणिक इमारतीच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी शाळेचे प्राचार्य व मानद सचिव शेन मॅकफर्सन, बिशप एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष रुडोल्फ वूडमन, डॉ. पूनावाला यांचे नातू डेरीयस पूनावाला, मुख्याध्यापिका मयुरा बारसे तसेच शाळेचे पदाधिकारी, शिक्षक, माजी विद्यार्थी, पालक आणि मान्यवर उपस्थित होते. शाळेच्या शैक्षणिक पायाभूत सुविधांचा विस्तार करण्याच्या उद्देशाने उभारण्यात आलेली ही नवीन इमारत प्रतिष्ठित माजी विद्यार्थी डॉ. सायरस एस. पूनावाला आणि अदार सी. पूनावाला यांच्या सहकार्याने साकारण्यात आली आहे. त्यांच्या सातत्यपूर्ण पाठिंब्यामुळे संस्थेच्या विकासाला महत्त्वपूर्ण गती मिळाली असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.

## हिमालया बेबीकेअरची बाळांसाठी उन्हाळी काळजी मोहीम सुरू




पुणे (आरंभ पर्व) : हिमालया बेबीकेअरने उन्हाळ्यासाठी नवीन जनजागृती मोहीम सुरू केली असून, उन्हाळ्यात बाळांची योग्य काळजी कशी घ्यावी याबाबत पालकांमध्ये जागरूकता निर्माण करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. बाळांच्या आरामदायी आणि सौम्य संगोपनावर भर देणाऱ्या या उपक्रमात प्रथमच उन्हाळी काळजीचा एक सोपा आणि उपयुक्त दिनक्रम सादर करण्यात आला आहे. हा दिनक्रम बाळांना उन्हाळ्यात थंडावा, ताजेपणा आणि आनंद देण्यास मदत करतो. या मोहिमेचा मुख्य भाग म्हणजे एक मनोरंजक दृकश्राव्य चित्रफीत. या चित्रफितीत बाळे जणू उन्हाळ्याविरोधात आंदोलन करताना दाखवली आहेत. "आम्हाला त्वचेवर पुरळ नकोत" आणि "घामापासून सुटका करा" अशा मागण्या करणारे फलक हातात घेऊन बाळे आपला त्रास व्यक्त करताना दिसतात. उन्हामुळे होणाऱ्या अस्वस्थतेविरोधात बाळांनीच मोर्चा काढल्याचे हे चित्रण अतिशय गोंडस आणि सहज समजणारे आहे.

## 'अब होगा हिसाब' १८ पासून; अविनाश मिश्रा करणार ओटीटीवर पदार्पण




मुंबई (आरंभ पर्व) : भारतातील आघाडीच्या मोफत व्हिडिओ स्ट्रीमिंग प्लॅटफॉर्म ॲमेझॉन एमएक्स प्लेअरने आपल्या बहुप्रतीक्षित 'अब होगा हिसाब' या ओरिजिनल सीरिजचा ट्रेलर प्रदर्शित केला आहे. पंजाबच्या पार्श्वभूमीवर आधारित असलेली ही सीरिज सूड, नातेसंबंध आणि रहस्यमय घटनांची रोमांचक कथा उलगडते. संजय कपूर, शाहीर आणि मौनी रॉय यांच्या प्रमुख भूमिका असलेल्या या सीरिजमधून अभिनेता अविनाश मिश्रा ओटीटी विश्वात पदार्पण करणार आहे. आरे स्टुडिओची निर्मिती असलेल्या या सीरिजमध्ये अविनाश मिश्रा, निमृत कौर अहलुवालिया, हरमन सिंघा आणि आशीमा वर्दान यांच्याही महत्त्वाच्या भूमिका आहेत. 'अब होगा हिसाब' ही सीरिज १८ जूनपासून ॲमेझॉन एमएक्स प्लेअरवर मोफत स्ट्रीम होणार आहे.

## ब्लू रिबँड जिन नव्या आधुनिक अवतारात

BLUE RIBAND GIN

पुणे (आरंभ पर्व) : ब्लू रिबँड जिनने आपल्या नव्या आकर्षक रूपाचे अनावरण केले असून, भारतातील सर्वाधिक प्रतिष्ठित जिन ब्रँडपैकी एकाला नव्या पिढीच्या ग्राहकांसाठी नव्याने सादर केले आहे. नव्या पॅकेजिंगमुळे ब्रँडला आधुनिक आणि प्रीमियम ओळख मिळाली आहे, तर त्याचा विश्वासार्ह स्वाद आणि समृद्ध वारसा कायम ठेवण्यात आला आहे, ज्यामुळे ब्लू रिबँड जिन अनेक दशकांपासून ग्राहकांची पसंती ठरली आहे. हा बदल विकसित होत असलेल्या बाजारपेठेत सुसंगत राहण्याची, शेल्फवरील आकर्षकता वाढवण्याची आणि दीर्घकाळापासून ब्रँडशी जोडलेल्या ग्राहकांसोबत तसेच आधुनिक जिन पसंत करणाऱ्या नव्या ग्राहकांसोबत अधिक मजबूत नाते निर्माण करण्याची ब्लू रिबँड जिनची वचनबद्धता दर्शवतो.







दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
रविवार, दि. १४ जून २०२६









# सचिन मोरे यांच्या जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन

### आमदार भीमराव तापकीर यांची प्रमुख उपस्थिती





> पक्षासाठी सातत्याने धडपडणारा, जनतेच्या प्रश्नांसाठी झटणारा आणि संघटन बळकट करण्यासाठी अहोरात्र परिश्रम घेणारा कार्यकर्ता म्हणून सचिन मोरे यांनी आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. आज नागरिकांमध्ये त्यांच्याविषयी विश्वास आणि अभिमानाची भावना आहे. त्यांच्या माध्यमातून या प्रभागातील विकासकामांना निश्चितच गती मिळेल. जनतेच्या सेवेसाठी त्यांनी सुरू केलेले हे जनसंपर्क कार्यालय नागरिकांसाठी मोठा आधार ठरेल,"
>
> **- आ. भीमराव तापकीर**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

प्रभाग क्र. ३५ मधील नागरिकांच्या समस्या तत्परतेने सोडविणे, विविध विकासकामांचा पाठपुरावा करणे आणि जनतेशी सातत्याने संवाद साधणे या उद्देशाने सिंहगड रोड क्षेत्रीय कार्यालय प्रभाग समिती अध्यक्ष, नगरसेवक सचिन मोरे यांच्या जनसंपर्क कार्यालय क्र. २ चे उद्घाटन खडकवासला विधानसभा मतदारसंघाचे आ. भीमराव तापकीर यांच्या शुभहस्ते उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. या उद्घाटन सोहळ्यास भाजपा शहराध्यक्ष धीरज घाटे, नगरसेवक महेश आवळे, नगरसेवक सुभाष नाणेकर, नगरसेवक हरिदास चरवड, नगरसेविका ज्योती गोसावी, माजी नगरसेविका अनुपमा लिमये, नगरसेविका धनश्री कोल्हे, मंडलाध्यक्ष यशवंत लायगुडे, विजय मते, प्रदेश भाजपा सचिव दत्ताभाऊ कोल्हे,पुणे ओबीसी मोर्चा सरचिटणीस रमेश गायकवाड, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष अनिल मते, यांच्यासह विविध मान्यवर व कार्यकर्ते उपस्थित होते..

यावेळी विविध मंडळांचे पदाधिकारी, पक्षाचे कार्यकर्ते तसेच स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उद्घाटनानंतर बोलताना आमदार भीमराव आण्णा तापकीर यांनी सचिन मोरे यांच्या कार्याचे विशेष कौतुक केले. "

तसेच पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या .त्यांनी जनसेवा आणि विकासाच्या माध्यमातून आणखी मोठे कार्य करावे," अशा शब्दांत त्यांनी शुभेच्छा दिल्या.

यावेळी नागरिकांच्या वतीने सचिन मोरे यांचा सत्कार करण्यात आला.. तसेच सचिन मोरे यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले..

यावेळी उपस्थित शहराध्यक्ष धीरज घाटे यांनी नवीन कार्यालयासाठी शुभेच्छा देत जनसेवा कार्याला अधिक बळ मिळेल, असा विश्वास व्यक्त केला. हे कार्यालय नागरिकांच्या समस्या, सूचना व तक्रारींचे निराकरण करण्याबरोबरच विविध विकासकामांबाबत प्रभावी समन्वय साधणारे केंद्र ठरणार असल्याचे मत घाटे यांनी व्यक्त केले. याप्रसंगी नगरसेवक सचिन मोरे यांनी उपस्थित मान्यवर, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिकांचे आभार मानत, "प्रभागाच्या सर्वांगीण विकासासाठी आणि नागरिकांच्या सेवेसाठी मी सदैव कटिबद्ध आहे. जनतेच्या प्रश्नांना प्राधान्य देऊन त्यांचे निराकरण करण्यासाठी हे जनसंपर्क कार्यालय प्रभावी माध्यम ठरेल," असे सांगितले.

उद्घाटन सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

## कारमधून १ लाख ३५ हजार रुपयांची रोकड लंपास

**लोणी काळभोर-चंद्रकांत दुंडे (दै. आरंभ पर्व)**

- **कदमवाकवस्ती, थेऊर फाटा व उरुळी कांचन परिसरात वाहनांमधून चोरीच्या घटनांमध्ये वाढ**

बँकेतून पैसे काढल्यानंतर त्यांची पाळत ठेवून कारमधील रोकड चोरणाऱ्या अज्ञात चोरट्याने १ लाख ३५ हजार रुपये लंपास केल्याची घटना कदमवाकवस्ती ग्रामपंचायत हद्दीतील कवडीपाट परिसरात शुक्रवारी (दि. १२ जून) दुपारच्या सुमारास घडली. याप्रकरणी लोणी काळभोर पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत श्रीकांत राजेंद्र सुंबे (वय ४०, रा. कुंजीरवाडी, ता. हवेली) यांनी फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सुंबे यांचा 'सिद्धी ट्रान्सपोर्ट' या नावाने पेट्रोल टँकरचा व्यवसाय आहे. त्यांनी कदमवाकवस्ती येथील युनियन बँकेच्या शाखेतून दीड लाख रुपये काढले होते. ही रक्कम त्यांनी त्यांच्या हुंडाई क्रेटा (एमएच १२ डब्ल्यूके ५३१०) कारच्या डॅशबोर्डमधील कप्प्यात ठेवली होती. यानंतर कवडीपाट येथील 'परफेक्ट कॅलिब्रेशन' केंद्रात १५ हजार रुपये देण्यासाठी ते आपल्या भावासह गेले. दुपारी सुमारे १.१० वाजण्याच्या सुमारास कार पार्क करून दोघेही कार्यालयात गेले. काही वेळानंतर परत आल्यानंतर त्यांनी डॅशबोर्ड तपासला असता उर्वरित १ लाख ३५ हजार रुपयांची रोकड गायब असल्याचे निदर्शनास आले.

घटनेची माहिती मिळताच त्यांनी तत्काळ '११२' क्रमांकावर संपर्क साधून पोलिसांना कळविले. पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली असून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. चोरीस गेलेल्या रकमेमध्ये ५०० रुपयांच्या २७० नोटांचा समावेश असल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. लोणी काळभोर पोलीस परिसरातील सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे पुढील तपास करीत आहेत.

### नागरिकांनी सतर्क राहण्याची गरज

पूर्व हवेलीतील अनेक गावांमध्ये बँकांमधून पैसे काढणाऱ्या नागरिकांवर पाळत ठेवून त्यांच्याकडील रोकड चोरी करण्याच्या घटनांमध्ये वाढ होत आहे. विशेषतः कदमवाकवस्ती, थेऊर फाटा आणि उरुळी कांचन परिसरात वाहनांमधून रोकड चोरीच्या घटना वारंवार घडत आहेत. त्यामुळे नागरिकांनी बँकेतून पैसे काढल्यानंतर ते वाहनात ठेवण्याऐवजी स्वतःजवळ सुरक्षित ठेवावेत. तसेच बँकांनीही परिसरात अधिक अंतरापर्यंत सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची व्यवस्था करण्याची गरज व्यक्त होत आहे.

## शिर्डीतील 'साई तीर्थ' बनले पर्यटकांचे नवे आकर्षण

### भक्ती, तंत्रज्ञान आणि मनोरंजनाचा अनोखा संगम श्रेया मालपानी, संचालक, मालपानी ग्रुप

**शिर्डी (दै. आरंभ पर्व)**

शिर्डीची सहल आता केवळ साईबाबांच्या दर्शनापुरती मर्यादित राहिलेली नसून, आधुनिक पर्यटनाच्या दृष्टीने नव्या अनुभवांची भर पडत आहे. साईबाबा मंदिरापासून अवघ्या पाच मिनिटांच्या अंतरावर असलेले 'साई तीर्थ भक्ती थीम पार्क' हे शिर्डीतील प्रमुख पर्यटन आकर्षण म्हणून उदयास आले आहे. भक्ती, संस्कृती, तंत्रज्ञान आणि मनोरंजनाचा अनोखा संगम असलेल्या या थीम पार्कमुळे पर्यटकांना एकाच छताखाली वेगळा अनुभव मिळत आहे.

मालपानी ग्रुपच्या संचालिका श्रेया मालपानी यांनी 'साई तीर्थ'मधील पाच प्रमुख आकर्षणांची माहिती देताना सांगितले की, भारतातील पहिले पूर्णपणे वातानुकूलित इनडोअर भक्ती थीम पार्क म्हणून 'साई तीर्थ'ची ओळख आहे. दर्शनानंतर कुटुंबे, ज्येष्ठ नागरिक, मुले आणि तरुणांसाठी हे एक आदर्श पर्यटनस्थळ ठरत आहे.



**तीर्थ यात्रा : देशभरातील मंदिरांचा एकाच ठिकाणी अनुभव**

'तीर्थ यात्रा' या आकर्षणाद्वारे पर्यटकांना देशातील दहा प्रसिद्ध मंदिरांची आभासी सफर घडवली जाते. आधुनिक व्हिज्युअल इफेक्ट्स, मोशन टेक्नॉलॉजी आणि कथाकथनाच्या माध्यमातून भारतातील विविध तीर्थक्षेत्रांचा अनुभव एकाच ठिकाणी घेता येतो.

**द्वारकामाई : श्रद्धा आणि शांततेचा प्रवास**

साई तीर्थच्या जवळ असलेली द्वारकामाई ही साईबाबांच्या वास्तव्यामुळे विशेष महत्त्वाची मानली जाते. येथे आजही अखंड धुनी प्रज्वलित असून, शांत आणि आध्यात्मिक वातावरणामुळे भाविकांना अंतर्मुख होण्याची संधी मिळते.

**विक्रमी साईबाबा मोझॅक**

युवा कलाकार चिन्मय प्रभू यांनी शेकडो रुबिक्स क्यूब्स वापरून साकारलेले साईबाबांचे भव्य मोझॅक हे 'इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्स'मध्ये नोंदले गेले आहे. भक्ती आणि सर्जनशीलतेचा संगम असलेली ही कलाकृती पर्यटकांसाठी विशेष आकर्षण ठरत आहे.

**लेझर शोमधून साकारते साईबाबांची जीवनगाथा**

संध्याकाळच्या वेळी आयोजित करण्यात येणारा लेझर शो प्रकाश, ध्वनी, संगीत आणि अत्याधुनिक प्रोजेक्शन तंत्रज्ञानाच्या माध्यमातून साईबाबांचे जीवन आणि शिकवणी प्रभावीपणे सादर करतो. हा अनुभव पर्यटकांच्या भेटीला संस्मरणीय बनवतो.

**'सबका मलिक एक'चा प्रेरणादायी संदेश**

'सबका मलिक एक' या सिनेमॅटिक सादरीकरणातून साईबाबांचे विचार, मानवता, करुणा, एकता आणि विश्वास यांचा संदेश प्रभावीपणे मांडला जातो. आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने सादर केलेला हा अनुभव सर्व वयोगटांतील पर्यटकांना भावनिकदृष्ट्या जोडून ठेवतो.

साईबाबा मंदिराजवळील सोयीस्कर स्थान, आधुनिक सुविधा आणि भक्ती-मनोरंजनाचा संगम यामुळे 'साई तीर्थ' हे शिर्डीतील अविभाज्य पर्यटनस्थळ बनले आहे. त्यामुळे शिर्डीला भेट देणाऱ्या अनेक पर्यटकांसाठी 'साई तीर्थ'चा अनुभव हा सहलीचा महत्त्वाचा भाग ठरत आहे.

# पाणीपुरवठा व ड्रेनेज कामांत अडथळा आणणाऱ्यांवर गुन्हे दाखल करा

### आयुक्तांचे निर्देश





**धायरी (दै. आरंभ पर्व)**

नवले पूल परिसरातील पाणीपुरवठा व ड्रेनेज लाईनच्या कामांमध्ये अडथळा आणणाऱ्या व्यक्ती अथवा संस्थांविरुद्ध थेट गुन्हे दाखल करण्यात यावेत, असे स्पष्ट निर्देश पुणे महानगरपालिका आयुक्त नवलकिशोर राम यांनी बुधवारी संबंधित अधिकाऱ्यांना दिले. नवले पूल परिसरात मंगळवारी मध्यरात्री झालेल्या भीषण अपघाताच्या पार्श्वभूमीवर आमदार भीमराव तापकीर, महापौर मंजुषा नागपुरे, स्थानिक लोकप्रतिनिधी आणि महापालिका अधिकाऱ्यांनी संयुक्त पाहणी केली. यावेळी परिसरातील वाहतूक कोंडी, वारंवार होणारे अपघात, अतिक्रमणे तसेच प्रलंबित विकासकामांचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

सेवा रस्ता रुंदीकरण, दिशादर्शक फलक उभारणे, रिफ्लेक्टर आणि स्ट्रीट लाईट बसविणे तसेच वाहनांच्या वेगावर नियंत्रण ठेवण्यासाठी आवश्यक उपाययोजना तातडीने राबविण्याच्या सूचना आयुक्तांनी दिल्या. रस्त्यालगतच्या व्यावसायिक आस्थापनांमुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होत असल्याने अतिक्रमण हटविण्याची मोहीम वेगाने राबविण्याचे निर्देशही त्यांनी यावेळी दिले.

तसेच विविध विभागांनी समन्वय राखून प्रलंबित विकासकामे जलद गतीने पूर्ण करावीत, असे सांगत नागरिकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देण्याचे आवाहन आयुक्तांनी केले.

पाहणीवेळी प्रभाग समिती अध्यक्ष सचिन मोरे, नगरसेवक हरिदास चरवड, संदीप बेलदरे, व्यंकोजी खोपडे, नगरसेविका कोमल नवले, जयश्री भूमकर, ज्योती गोसावी, कोमल कुटे, प्रभाग अध्यक्ष राजू कुटे, मंडलाध्यक्ष विजय मते तसेच महापालिकेचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. नवले पूल परिसर कायमस्वरूपी अपघातमुक्त करण्यासाठी तातडीने ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी स्थानिक नागरिकांनी केली. पाहणीदरम्यान सुचविण्यात आलेल्या उपाययोजनांचा अहवाल तातडीने सादर करण्याचे निर्देश संबंधित विभागांना देण्यात आले असून, विविध यंत्रणांच्या समन्वयातून आवश्यक कामे हाती घेण्यात येणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले.

## थोडक्यात पण महत्वाचे

### व्हाईट मिसचीफ व्होडकाच्या नव्या आणि प्रीमियम अवताराचे अनावरण



पुणे (आरंभ पर्व) : भारतातील सर्वाधिक लोकप्रिय व्होडका ब्रँड्सपैकी एक असलेल्या व्हाईट मिसचीफ व्होडकाने आपल्या मुख्य पोर्टफोलिओमध्ये व्यापक ब्रँड रिवॅम्प आणि प्रीमियमायझेशनची घोषणा केली आहे. हा बदल ब्रँडच्या प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा असून, अधिक दर्जेदार पण सहज आणि आनंददायी ड्रिंकिंग अनुभव शोधणाऱ्या नव्या पिढीच्या ग्राहकांसाठी ब्रँडची नव्याने मांडणी करण्यात आली आहे. या नव्या पोर्टफोलिओमध्ये आकर्षक आणि आधुनिक पॅकेजिंग डिझाइन, अधिक प्रभावी व्हिज्युअल ओळख आणि अधिक स्मूथ व आधुनिक व्होडका अनुभव देण्यासाठी विकसित केलेले सुधारित लिक्विड प्रोफाइल समाविष्ट आहे. ब्रँडची युवा आणि उत्साही ओळख कायम ठेवत, नव्या व्हाईट मिसचीफ व्होडकाला अधिक प्रीमियम आणि आधुनिक रूप देण्यात आले आहे, जे बदलत्या ग्राहकांच्या पसंतीशी सुसंगत आहे.

### इनब्रू बेव्हरेजेसने सादर केली रोमानोव जॅझी जांभूळ मिंट व्होडका



पुणे (आरंभ पर्व) : भारतातील सर्वाधिक लोकप्रिय व्होडका ब्रँडपैकी एक असलेल्या रोमानोव व्होडकाने महाराष्ट्रात रोमानोव जॅझी जांभूळ मिंट व्होडका लॉन्च करून आपल्या सर्वात धाडसी फ्लेवर इनोव्हेशनची घोषणा केली आहे. जांभळाच्या समृद्ध आणि परिचित चवीला ताजेतवाने मिंट फिनिशची जोड देणारा हा नवीन प्रकार ब्रँडच्या फ्लेवर्ड व्होडका पोर्टफोलिओमध्ये महत्त्वाची भर घालतो आणि आजच्या ग्राहकांसाठी नाविन्यपूर्ण फ्लेवर अनुभव निर्माण करण्याच्या रोमानोवच्या वचनबद्धतेला अधिक बळकटी देतो. हा लॉन्च ग्राहकांच्या बदलत्या आवडी-निवडी ओळखून त्यानुसार आधुनिक आणि सुसंगत उत्पादने विकसित करण्याच्या रोमानोवच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचे प्रतीक आहे. ग्राहक अधिक वेगळे फ्लेवर्स आणि अनोखे ड्रिंकिंग अनुभव शोधत असताना, सांस्कृतिक संदर्भ आणि आधुनिक चवींचा समतोल साधणाऱ्या मजबूत इनोव्हेशन पाइपलाइनच्या माध्यमातून रोमानोव बाजारपेठेत आघाडीवर राहण्यास कटिबद्ध आहे.

### एएम/एनएस इंडिया आणि आयआयटी रुडकी यांच्यात करार



सुरत (आरंभ पर्व) : एएम/एनएस इंडिया आणि Indian Institute of Technology Roorkee (आयआयटी रुडकी) यांच्यात शिक्षण, संशोधन, नवतंत्रज्ञान आणि उद्योग-संवाद क्षेत्रात सहकार्य वाढविण्यासाठी सामंजस्य करार करण्यात आला आहे. या करारामुळे उत्पादन आणि पोलाद क्षेत्रातील कौशल्यविकास, संशोधन आणि औद्योगिक स्पर्धात्मकता वाढण्यास मदत होणार आहे. उद्योग क्षेत्रातील व्यावहारिक अनुभव आणि आयआयटी रुडकीचे शैक्षणिक व संशोधन क्षेत्रातील योगदान यांचा संगम या करारातून साधला जाणार आहे. उद्योग आणि शैक्षणिक संस्थांमधील दरी कमी करून भविष्यातील कुशल मनुष्यबळ तयार करणे हा या कराराचा प्रमुख उद्देश आहे. या कराराअंतर्गत दोन्ही संस्था संयुक्तपणे शैक्षणिक कार्यक्रम, वरिष्ठ अधिकाऱ्यांसाठी विशेष प्रशिक्षण, व्यावसायिक विकास अभ्यासक्रम आणि मनुष्यबळ विकास उपक्रम राबविणार आहेत. तसेच उद्योगाभिमुख सल्लागार सेवा, तांत्रिक मूल्यमापन, समस्या निवारण, संयुक्त संशोधन, बौद्धिक संपदा निर्मिती आणि तंत्रज्ञान हस्तांतरण यांसारख्या उपक्रमांवरही भर दिला जाणार आहे.

### आयसीसी महिला टी२० विश्वचषक २०२६ साठी विशेष मोहिम

पुणे (आरंभ पर्व) : ह्युंडाई मोटर इंडिया लि.(एचएमआयएल) तर्फे आयसीसी महिला टी20 विश्वचषक 2026 साठी नवीन ब्रँड मोहिम सादर करण्यात आली आहे.यामध्ये कंपनीचे ब्रँड ॲम्बेसिडर असलेल्या स्मृती मंधाना आणि जेमिमा रॉड्रिग्स यांचा या मोहिमेत समावेश आहे.महिला क्रिकेटपटूंची जिद्द,कौशल्य आणि वर्चस्व हे यानिमित्त सादर केलेल्या फिल्ममध्ये अधोरेखित केले आहे.

### ॲक्सिस मॅक्स लाईफकडून २,५३० कोटींचा पार्टिसिपेटिंग बोनस जाहीर

पुणे (आरंभ पर्व) : मॅक्स लाईफ इन्शुरन्स कंपनी लिमिटेड म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ॲक्सिस मॅक्स लाईफ इन्शुरन्स लिमिटेडने आर्थिक वर्ष २०२५-२६ साठी पात्र पॉलिसीधारकांकरिता २,५३० कोटी रुपयांच्या सहभागी (पार्टिसिपेटिंग) बोनसची (पीएआर) घोषणा केली आहे. हा कंपनीचा सलग २४ वा वार्षिक बोनस असून, यामुळे कंपनीने गेल्या २४ वर्षांत घोषित केलेला एकूण बोनस १८,३७७ कोटी रुपयांवर पोहोचला आहे. हा जाहीर केलेला बोनस जुलै २०२६ पासून २१ लाखांहून अधिक पात्र पीएआर पॉलिसीधारकांना वितरित करण्यात येईल. ॲक्सिस मॅक्स लाईफचा पीएआर फंड आर्थिक वर्ष २०२५ मधील ७४,११९ कोटी रुपयांवरून आर्थिक वर्ष २०२६ मध्ये ७९,००३ कोटी रुपयांवर पोहोचला आहे. गेल्या एका दशकात पीएआर फंडात १७ टक्के चक्रवाढ व्याजाने (सीएजीआर) वाढ झाली आहे. कंपनीने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार, कंपनीच्या वार्षिक बोनस घोषणांमध्ये अलिकडच्या वर्षांत सातत्याने वाढ झाली आहे. कंपनीने आर्थिक वर्ष २०२२ मध्ये जाहीर केलेला बोनस १,४६९ कोटी रुपये होता, तो आर्थिक वर्ष २०२३ मध्ये १,६०४ कोटी रुपये, आर्थिक वर्ष २०२४ मध्ये १,८२६ कोटी रुपये, आर्थिक वर्ष २०२५ मध्ये कोटी रुपये आणि आर्थिक वर्ष २०२६ मध्ये कोटी रुपयांपर्यंत पोहोचला आहे. ॲक्सिस मॅक्स लाईफने दिलेल्या माहितीनुसार, तिच्या सहभागी उत्पादनांवर रोख बोनस, रिव्हर्शनरी बोनस आणि टर्मिनल बोनस यांसारख्या विविध प्रकारच्या बोनसच्या ऑफर उपलब्ध आहेत. याशिवाय, मूळ रकमेच्या निश्चितीला धक्का न लावता बोनस संचय, जमा झालेल्या बोनसची आंशिक उचल, पेड-अप ॲडिशन्स आणि प्रीमियम ऑफसेट यांसारखे पर्यायही या उत्पादनांवर उपलब्ध आहेत.

# खेड तहसीलदारांचे अधिकार काढले

**किरण खुडे**



**राजगुरूनगर (दै. आरंभ पर्व)**

तहसीलदार प्रशांत बेडसे यांच्या कार्यकाळातील खेड तहसील कार्यालयाच्या कामकाजाबाबत तक्रारींची दखल घेत, प्राप्त तक्रारी आणि प्राथमिक तपासणीत आढळलेल्या अनियमिततेच्या पार्श्वभूमीवर खेड तहसील कार्यालयातील काही महत्त्वाचे अधिकार काढून घेण्याचे आदेश पुण्याचे अप्पर जिल्हाधिकारी सतीश राऊत यांनी शुक्रवारी (दि. १२) जारी केले.

खेडचे तहसीलदार प्रशांत बेडसे यांच्या कार्यकाळातील कामकाजाबाबत नागरिकांनी वरीष्ठ शासन स्तरावर केलेल्या तक्रारींची दखल घेत प्रशासनाने मोठी कारवाई केली आहे.

विश्वसनिय सुत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, महसूल व वन विभागाकडे तसेच राज्य शासनाकडे खेड तहसील कार्यालयाच्या कामकाजाबाबत अनेक लोकप्रतिनिधी व नागरिकांकडून तक्रारी दाखल झाल्या होत्या. त्यानंतर शासनाने प्रशांत बेडसे यांच्या कार्यकाळातील संपूर्ण कामकाजाची चौकशी करण्याचे निर्देश दिले आहेत. या अनुषंगाने विभागीय आयुक्त कार्यालयाच्या आदेशानुसार तपासणी समिती गठित करण्यात आली.

समितीने १३ मे २०२६ रोजी तहसील कार्यालयाची तपासणी केली. या तपासणीत गौणखनिज, अकृषिक (एनए) तसेच अर्धन्यायिक प्रकरणांच्या प्राथमिक पडताळणीत काही अनियमितता आढळल्याचे नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे संबंधित प्रकरणांची सखोल चौकशी सुरू असल्याचे आदेशात नमुद केले आहे.

चौकशी पूर्ण होईपर्यंत आणि निष्पक्षता राखण्यासाठी खेड तहसीलदार यांच्याकडील काही अधिकार काढून घेण्यात आले आहेत. त्यानुसार, राजगुरूनगर व करंजविहिरे मंडळातील सर्व गौणखनिज आणि अर्धन्यायिक प्रकरणे तहसीलदार आंबेगाव यांच्याकडे वर्ग करण्यात आली आहेत. आणि चाकण व आळंदी मंडलातील सर्व गौणखनिज आणि अर्धन्यायिक प्रकरणे तहसीलदार मावळ यांच्याकडे सोपविण्यात आली आहेत. संबंधित प्रकरणांतील सुनावण्या व न्यायालयीन कामकाज खेड (मुख्यालय) येथेच होणार असून त्यासाठी तहसीलदार मावळ व आंबेगाव हे दर १५ दिवसांनी नागरीकांच्या सोईनुसार उपस्थित राहणार आहेत. सर्व प्रकरणांमध्ये संबंधित पक्षकारांना पूर्वसूचना देऊन कायद्यानुसार सुनावणी घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. प्रकरणांच्या सुनावणी व आदेशांची माहिती पारदर्शकतेसाठी ई-कोर्ट प्रणालीवर प्रकाशित करण्याचेही आदेश पारीत केले आहेत. तसेच वर्ग करण्यात आलेल्या सर्व प्रकरणांच्या मूळ संचिका योग्य पानांकन करून संबंधित कार्यालयांना पाठविण्याच्या सूचनाही प्रशासनाला दिल्या आहेत.

खेड तालुक्यातील महसूल प्रशासनाविरोधात सातत्याने होत असलेल्या तक्रारींच्या पार्श्वभूमीवर ही कारवाई महत्त्वाची मानली जात आहे. चौकशी अहवालानंतर आणखी कोणती कारवाई होते, याकडे तालुक्याचे लक्ष लागले आहे. तसेच विविध तर्कवितर्कांना उधाण आले आहे.

## इंडियन कॅन्सर सोसायटीच्या ‘उगम’ उपक्रमाची १७ वर्षे पूर्ण

- बालपणीच्या कर्करोग विजेत्यांना नवे बळ



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

कर्करोग नियंत्रणासाठी कार्य करणारी भारतातील पहिली स्वयंसेवी आणि ना-नफा तत्त्वावरील संस्था इंडियन कॅन्सर सोसायटी (आयसीएस) यांच्या प्रमुख बालक कर्करोग सर्व्हायव्हरशिप उपक्रम ‘उगम’च्या १७ व्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात मुंबईतील ५२५ पेक्षा जास्त कर्करोग विजेते, त्यांचे कुटुंबीय, आरोग्यसेवा क्षेत्रातील तज्ज्ञ, समर्थक आणि हितचिंतक सहभागी झाले होते.

२००९ मध्ये स्थापन झालेल्या ‘उगम’ची पायाभरणी एका साध्या पण प्रभावी विश्वासावर झाली होती. कर्करोगावर मात करणे हा प्रवासाचा शेवट नसून, नव्या संधी, स्वप्ने आणि उद्दिष्टांनी भरलेल्या आयुष्याची सुरुवात आहे. टाटा मेमोरियल रुग्णालयातील कर्करोग विजेत्यांच्या एका गटाने इंडियन कॅन्सर सोसायटीच्या स्वयंसेवी सहाय्य गटाच्या रूपाने या उपक्रमाची सुरुवात केली.

‘उगम’च्या प्रेरणादायी प्रवासातून प्रेरणा घेत इंडियन कॅन्सर सोसायटीने देशभरात १९ ॲक्ट क्लिनिक्स सुर करण्यास मदत केली असून, त्यामध्ये ४,००० पेक्षा जास्त कर्करोग विजेत्यांची नोंदणी करण्यात आली आहे. ‘प्रोजेक्ट पिकासो’ या उपक्रमाच्या माध्यमातून उपचारानंतरच्या आयुष्यातही कर्करोग विजेत्यांना आवश्यक आधार आणि मार्गदर्शन दिले जात असल्याची माहिती इंडियन कॅन्सर सोसायटीच्या वैद्यकीय व्यवहार विभागाच्या उपमहासंचालक) डॉ. वंदना धामणकर यांनी दिली.

यंदाच्या वर्धापनदिन सोहळ्याची संकल्पना महाभारतातील संघर्ष, धैर्य, मैत्री आणि संकटांवर मात करून मिळविलेल्या विजयाच्या प्रेरणेतून साकारण्यात आली होती. ‘संघर्ष से साहस तक’ ही यंदाच्या कार्यक्रमाची मध्यवर्ती संकल्पना होती. संघर्षातून यशाकडे वाटचाल करणाऱ्या कर्करोग विजेत्यांचा प्रेरणादायी प्रवास या संकल्पनेतून अधोरेखित करण्यात आला. कार्यक्रमातील प्रत्येक घटकाने या संकल्पनेचा आशय प्रभावीपणे उलगडून दाखविला.

"या सोहळ्याला महाराष्ट्र राज्याचे कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्री श्री. मंगल प्रभात लोढा मुख्य अतिथी म्हणून उपस्थित होते. तर टाटा मेमोरियल सेंटरचे 'डीन - अकॅडमिक प्रोजेक्ट्स' आणि टाटा कॅन्सर केअर फाउंडेशनचे मुख्य सल्लागार डॉ. कैलाश शर्मा यांची विशेष अतिथी म्हणून उपस्थिती होती. याप्रवासा सोहळ्याला इंडियन कॅन्सर सोसायटीचे विश्वस्त, देणगीदार, समर्थकांसह वैद्यकीय क्षेत्रातील नामांकित कर्करोग तज्ज्ञ आणि मानसोपचार-कर्करोग तज्ज्ञ मोठ्या संख्येने उपस्थित होते."

## पत्रकारांनी मांडलेल्या सूचनेवर कारवाई करणार : हेमंत शेंडगे



**दौंड (दै. आरंभ पर्व)**

दौंड पोलीस स्टेशनचे नवनिर्वाचित प्रभारी पोलिस निरीक्षक हेमंत शेंडगे यांनी दौंड पोलीस स्टेशनमध्ये पत्रकारांशी संवाद साधला, पत्रकारांनी संघटित गुन्हेगारी, अवैध धंदे, रोड रोमिओ, दौंड शहर परिसरामध्ये तळीराम बसणाऱ्या अड्ड्यावर कारवाई करणार, गोपाळवाडी रोड परिसरामध्ये गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांकडून रस्त्यावर केक कापून दहशत निर्माण करणाऱ्या सीसीटीवी च्या आधारे कारवाई करणार, शहरांमधील दारू,मटका,जुगार चक्री गांजा इत्यादी धंद्यावर कारवाई करून संघटित गुन्हेगारी संपवण्याचा प्रयत्न करणार, सरपंच वस्ती या ठिकाणी असलेल्या पोलीस चौकी पुन्हा चालू करणार यामुळे त्या परिसरात होणारी गुन्हेगारी थोडेफार प्रमाणात कमी करण्यास मदत होईल, अशा अनेक प्रकारे पत्रकारांनी सूचना मांडल्या, या सूचनेवर कारवाई करतात अशी ही माहिती दौंड पोलीस निरीक्षक हेमंत शेंडगे यांनी दिली, शेंडगे यांनी यापूर्वी वर्धा मोहोळ सोलापूर यवत अशा अनेक ठिकाणी उल्लेखनीय काम केले आहे, दौंड पोलीस स्टेशन हद्दीमध्ये कायद्याचे राज्य आणणार का यासाठी नवनिर्वाचित दौंड पोलीस निरीक्षक हेमंत शेंडगे यांना काही वेळ द्यावा लागेल, अवैध धंद्यांना तसेच संघटित गुन्हेगारी मोडीत काढतील अशी अपेक्षा दौंडवासीयांकडून केली जात आहे.

## सोनालिकाने सर्वाधिक एकंदर १७,२०४ ट्रॅक्टर केली विक्री

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

भारतातील नंबर १ ट्रॅक्टर निर्यात ब्रँड असलेल्या सोनालिका ट्रॅक्टर्सने मे महिन्यातील आतापर्यंतची सर्वाधिक १७,२०४ ट्रॅक्टरची विक्री नोंदवत आर्थिक वर्ष २०२७ मध्ये आपल्या गतीला वेग दिला आहे. तसेच एकूण २१ टक्के वाढ नोंदवून उद्योगाच्या कामगिरीलाही मागे टाकले आहे. सोनालिकाचा हा नवा मैलाचा दगड शेतकऱ्यांपर्यंत 'जीतने का दम' पोहोचवण्यावर ब्रँडने सातत्याने दिलेला भर आणि भारताला कृषी महासत्ता बनवण्याच्या उद्देशाने शेतीच्या दृष्टीने कार्यक्षम आणि समृद्ध राष्ट्र निर्माण करण्यात त्याची भूमिका अधोरेखित करणारा आहे. याशिवाय कंपनीने भारतातील आगामी खरीप हंगामाच्या तयारीचा एक भाग म्हणून



आजपर्यंतच्या सर्वाधिक मासिक १७,०२९ ट्रॅक्टर उत्पादनाची नोंद केली आहे. मान्सून हा अनेक दशकांपासून भारतीय शेतीमध्ये आशावादाला चालना देणारा एक महत्त्वाचा घटक आहे. मात्र, शेतकरी आता सुधारित पीक व्यवस्थापन आणि चांगल्या उत्पादनासाठी सिंचनाच्या वाढत्या तीव्रतेवर अवलंबून राहत असून तांत्रिकदृष्ट्या प्रगत ट्रॅक्टर शोधत आहेत.

## एएम/एनएस इंडिया आणि बिट्स पिलानीच्या पुढाकारातून विकासाला चालना

### मॅन्युफॅक्चरिंग मॅनेजमेंटमधील पहिल्या एमबीए बॅचच्या पदवीदान समारंभाचे आयोजन



**नवी दिल्ली (दै. आरंभ पर्व)**

जगातील आघाडीच्या दोन पोलाद उत्पादक कंपन्यांचा संयुक्त उपक्रम असलेल्या एएम/एनएस इंडिया ने बिट्स पिलानीसोबतच्या आपल्या धोरणात्मक भागीदारीद्वारे कौशल्य विकास आणि क्षमता वृद्धीबाबतची बांधिलकी अधिक दृढ केली आहे. प्रोसेस इंजिनिअरिंगमधील बी.टेक. कार्यक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीनंतर, एएम/एनएस इंडियाने मॅन्युफॅक्चरिंग मॅनेजमेंटमधील पहिल्या एमबीए बॅचच्या पदवीदानासह आणखी एक महत्त्वपूर्ण टप्पा गाठला आहे.

दीक्षांत समारंभ गुरुवारी एएम/एनएस इंडियाच्या हजीरा येथील प्रमुख प्रकल्पात आयोजित करण्यात आला. या समारंभाला सुरतचे पोलीस आयुक्त, आयपीएस अधिकारी अनुपम सिंह गहलोत हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

पोलाद क्षेत्रात कार्य-अभ्यास एकात्मिक शिक्षण स्वीकारण्यात आघाडीवर असलेल्या एएम/एनएस इंडियाने भविष्यासाठी सज्ज मनुष्यबळ विकसित करण्यासाठी वर्क इंटिग्रेटेड लर्निंग प्रोग्राम्स (डब्लूआयएलपी) चा प्रभावीपणे वापर केला आहे. बी.टेक. कार्यक्रमाची यशस्वी अंमलबजावणी आणि विस्तार केल्यानंतर, विविध विभागांतील नेतृत्व क्षमता अधिक बळकट करण्याच्या उद्देशाने कंपनीने मॅन्युफॅक्चरिंग मॅनेजमेंटमधील एमबीए कार्यक्रम सुरू केला. सध्या या कार्यक्रमाच्या अनेक बॅचेस सुरू असून, कर्मचाऱ्यांचा उत्स्फूर्त सहभाग आणि सातत्यपूर्ण शिक्षणाबाबत संस्थेची दृढ बांधिलकी याचे ते प्रतीक आहे.

पारंपरिक एमबीए कार्यक्रमांपेक्षा वेगळा असलेला बिट्स पिलानीचा एएम/एनएस इंडिया साठीचा अभ्यासक्रम आधुनिक पोलाद उत्पादन क्षेत्रातील गुंतागुंतीच्या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी विशेषतः तयार करण्यात आला होता. या कठोर आणि सर्वसमावेशक कार्यक्रमामध्ये पुरवठा साखळीचे अनुकूलन, धोरणात्मक वित्त व्यवस्थापन आणि संस्थात्मक नेतृत्व यांसारख्या व्यवस्थापनाच्या मूलभूत तत्त्वांसह डिजिटल परिवर्तन, शाश्वत उत्पादन पद्धती आणि माहिती-आधारित निर्णयप्रक्रिया यांसारख्या विशेष अभ्यासक्रमांचाही समावेश करण्यात आला होता.

# किती दिवस नवले पुलालाच दोष देणार?

चर्चा तर होणारच
अभिषेक मरगळे



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुण्यातील नवले पूल हा आज केवळ वाहतुकीचा मार्ग राहिलेला नाही, तर तो आपल्या व्यवस्थेतील त्रुटी, प्रशासनाची उदासीनता आणि सामूहिक निष्काळजीपणाचे जिवंत प्रतीक बनला आहे. दर काही महिन्यांनी येथे एखादा भीषण अपघात होतो, निष्पाप जीव जातात, माध्यमांमध्ये चर्चा रंगते, बैठका घेतल्या जातात आणि काही दिवसांनी सर्व काही पुन्हा पूर्ववत होते. मात्र प्रश्न कायम राहतो – आपण नेमके किती दिवस नवले पुलालाच दोष देत बसणार?

गेल्या काही वर्षांत या परिसरात शेकडो अपघात झाले आहेत. अनेक कुटुंबांनी आपले प्रियजन गमावले आहेत. त्यामुळे हा भाग ‘अपघातप्रवण क्षेत्र’ म्हणून ओळखला जाऊ लागला आहे. पण इतक्या दुर्घटनांनंतरही कायमस्वरूपी आणि परिणामकारक उपाययोजना मात्र अद्याप दिसत नाहीत. प्रत्येक अपघातानंतर तीच कारणे पुढे येतात – ब्रेक निकामी झाले, वाहनावरील नियंत्रण सुटले किंवा चालकाची चूक होती. पण इतक्या वेळा तीच कारणे समोर येत असतील, तर समस्येच्या मुळाशी जाण्याची गरज नाही का?

देशभरात डोंगराळ घाट आहेत, तीव्र उतार आहेत आणि अवघड रस्ते आहेत. तरीही नवले पुलाच्या परिसरातच अपघातांचे प्रमाण इतके जास्त का आहे? हा प्रश्न केवळ रस्त्याचा नाही, तर संपूर्ण व्यवस्थेचा आहे. अवजड वाहन चालवणे हे सामान्य वाहन चालवण्याइतके सोपे काम नाही. ट्रक, कंटेनर आणि टँकरसारखी वाहने चालवणाऱ्या चालकांकडे विशेष कौशल्य असणे आवश्यक आहे. लाखो रुपयांच्या मालासोबत अनेक मानवी जीवांची जबाबदारी त्यांच्या हातात असते. मग अशा वाहनांसाठी अधिक कठोर प्रशिक्षण, नियमित पात्रता चाचण्या आणि स्वतंत्र परवाना प्रणाली का नसावी?

चालकांच्या कौशल्याकडे गांभीर्याने पाहिल्याशिवाय अपघातांचे प्रमाण कमी होणे कठीण आहे. याचबरोबर प्रशासनाची जबाबदारीही तितकीच महत्त्वाची आहे. एखादा रस्ता वारंवार अपघात घडवत असेल, तर केवळ सूचना फलक लावणे किंवा वेगमर्यादेची आठवण करून देणे पुरेसे ठरत नाही. रस्त्याची रचना, उतार, सुरक्षितता उपाय, आपत्कालीन व्यवस्था आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर याकडेही तितक्याच गांभीर्याने पाहिले गेले पाहिजे. अनेक तज्ज्ञांनी नवले पुलाच्या परिसरातील रस्त्याच्या रचनेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. त्यामुळे या बाबींचे स्वतंत्र तांत्रिक परीक्षण होणे गरजेचे आहे.

मात्र सर्वात मोठी समस्या आहे ती जबाबदारी स्वीकारण्याची. अपघात घडल्यानंतर वाहतूक विभाग महामार्ग प्राधिकरणाकडे बोट दाखवतो, महामार्ग प्राधिकरण प्रशासनाकडे, प्रशासन चालकांकडे आणि चालक रस्त्याकडे. या दोषारोपांच्या साखळीत खरा प्रश्न हरवून जातो. जबाबदारी निश्चित होत नाही आणि बदलही घडत नाही.

भारतामध्ये नियमांची कमतरता नाही. कमतरता आहे ती त्यांच्या प्रभावी अंमलबजावणीची. रस्ते सुरक्षित करणे, कुशल चालक घडवणे, वाहनांची नियमित तपासणी करणे आणि नियमांचे काटेकोर पालन सुनिश्चित करणे ही केवळ शासनाची जबाबदारी नाही, तर संपूर्ण समाजाची सामूहिक जबाबदारी आहे.

आज आवश्यकता आहे ती दोषारोपांच्या राजकारणाची नव्हे, तर ठोस निर्णयांची. कारण प्रत्येक अपघातानंतर वाहिलेली श्रद्धांजली काही दिवसांत विस्मरणात जाते; पण ज्यांच्या घरचा आधार कायमचा हरपतो, त्यांचे दुःख कधीच संपत नाही.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.